दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १६७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.१० सप्टेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com






### आ.प्रशांत ठाकूर यांच्या मागणीला यश

# कळंबोली सर्कलचा होणार विस्तार

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्या अधिकाऱ्यांना सूचना



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल–उरण परिसरात असलेले विविध महत्वाकांक्षी प्रकल्प आणि त्या पार्श्वभूमीवर अत्यंत वर्दळीचे असलेले कळंबोली सर्कल विकसित करण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीची दखल घेऊन केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी कळंबोली सर्कलचा विस्तार करण्याच्या दृष्टिकोनातून मंगळवारी बैठक आयोजित केली होती. कळंबोली सर्कलच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा सल्लागार नेमा, असा सल्ला त्यांनी सिडको आणि इतर यंत्रणांना दिला आहे.

मुंबई, ठाणे, कल्याण –डोंबिवली से पनवेल उरण जेएनपीटीकडे जाणाऱ्या महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची रहदारी असते. पनवेल– उरण ते मुंबई– ठाणे कडून हि वाहतूक जेएनपीटी कडे ये– जा होत असताना अवजड कंटेनर, प्रवासी वाहतूक कळंबोली एमजीएम सर्कल येथून चोविस तास मार्गक्रमण करीत असते, त्यामुळे कळंबोली सर्कल हे ठिकाण रहदारीचे आणि महत्त्वाचे जंक्शन आहे. आणि या कारणास्तव, वाहतूक कोंडीची समस्या नेहमीच कळंबोली एमजीएम



जंक्शन परिसरात भेडसावते आणि कधीकधी तर तासनतास 'ट्रॅफिक जाम' होतो, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात इंधन आणि वेळ वाया जाते. त्यामुळे वाहतूक कोंडीतून पनवेलकरांची मुक्तता करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना विनंती केली होती. त्या विनंतीनुसार (दि. ०७) दिल्लीत बैठक पार पडली.

जेएनपीटी आंतरराष्ट्रीय बंदरामुळे उरण, पनवेल परिसरात अवजड वाहतूक ही डोकेदुखी ठरली आहे. याचा सर्वाधिक परिणाम वेगवेगळे रस्ते एकत्र येणाऱ्या कळंबोली सर्कलवर झाला आहे. मुंबईहून पुणे, पनवेल, अलिबाग, गोवा दिशेने जाणारी वाहतूक ठाणे आणि मुंब्र्याहून जेएनपीटी, पुणे, अलिबागच्या दिशेने जाणारी वाहतूक या सगळ्यांसोबत स्थानिक वाहनचालकांना दररोज ये–जा करण्यासाठी कळंबोली सर्कल पार करावे लागते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमाने उड्डाणे घेऊ लागल्यानंतर मुंबईतील 'एअर ट्रॅफिक' कमी होईल, मात्र नवी मुंबईतील रस्त्यावरील कोंडी वाढू नये, या पार्श्वभूमीवर कळंबोली वाहतूक सर्कल विकसित करणे आवश्यक असणार आहे. जेएनपीटी, सिडको आणि राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरणाने एकत्र

.../२

### रोटरी प्रकारचे सर्कल

**जेएनपीटी बंदराकडे जाणारी अवजड वाहतूक, विमानतळावरून थेट पुण्याकडे जाणारी वाहतूक एकमेकांना अडथळा न करता थेट मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर जाता येईल, यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'रोटरी' प्रकारचे सर्कल विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात आणखी भविष्याचे नियोजन करून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागाराचा सल्ला घेऊन पुन्हा बैठक घेतली जाणार आहे.**

### ना.नितीन गडकरी यांनीच विषद केली परिस्थिती

**दिल्लीत झालेल्या बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी कळंबोली सर्कलच्या कोंडीची कहाणी सांगण्यापूर्वीच नामदार नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना सर्कलवर होणाऱ्या कोंडीची माहिती दिली. त्यामुळे आम्हाला माहिती सांगण्याची गरज पडली नाही, अशी माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.**

# महिला पोलिसाने दिली सहकाऱ्याच्या हत्येची सुपारी ; आरोपी अटकेत

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल** : मुंबई पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या एका महिला पोलीस शिपाईनेच तीचे पोलीस सहकाऱ्याबरोबर झालेल्या वादातून त्याची हत्या करण्याची सुपारी देवून त्याची हत्या घडवून आणल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी तीघा जणांना ताब्यात घेतले असून यांच्या अटकेमुळे अपघात झालेला गुन्हा हा दाखविला असतानाही पोलिसांच्या चाणाक्ष नजरेतून व मयत इसमाच्या कुटुंबियांनी व्यक्त केलेल्या संशयामुळे खऱ्या गुन्ह्याला वाचा फुटली आहे.

पनवेल रेल्वे स्टेशन ते मालधक्का जाणाऱ्या रस्त्यावर भगत चाळीसमोर मयत शिवाजी माधवराव सानप (५४) कार्यरत मुंबई पोलीस यांना कोणत्या तरी अज्ञात वाहनाने धडक मारल्याने ते गंभीररित्या जखमी झाले होते व त्यात त्यांचा मृत्यू झाला होता. प्राथमिक स्वरुपात मोटार अपघात म्हणून गुन्हा नोंदविण्यात आला होता. परंतु या घटनेसंदर्भात सानप यांच्या कुटुंबियांनी संशय व्यक्त केला. तसेच पोलिसांच्या चाणाक्ष नजरेतून काही गोष्टी त्यांच्या समोर आल्याने नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह, सह.पोलीस आयुक्त डॉ.जय जाधव, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहा. पोलीस आयुक्त भागवत सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे व त्यांच्या पथकाने या गुन्ह्याची सखोल चौकशी करण्यास सुरूवात केली. घटनास्थळ, परिसर व सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल फोन, आलेले फोन, केलेले फोन व इतर तांत्रिक तपासाचा आधार घेवून व त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या माहितीच्या आधारे शिवाजी सानप हे रेल्वे स्थानकात उतरुन पायी जात असताना यातील आरोपी विशाल जाधव व गणेश चव्हाण उर्फ मुदावथ याने त्याच्या ताब्यातील नॅनो गाडीने जाणीवपूर्वक जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांना जबर ठोकर मारुन गंभीर जखमा करून त्यांचा खुन केल्याचे निष्पन्न झाले आहे. या

.../२




# अभिष्टचिंतन...





दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील, राकेश पितळे, सचिन पोतदार, अरविंद पोतदार संजय कदम, मयुर तांबडे, अनिल कुरघोडे, सुभाष वाघपंजे, के.सी.सिंग, राजेश डांगळे, सुधिर पाटील, सुरेश पाटील आदी मान्यवर.



# संकटाचे पडघम

बांगलादेश जन्माला येण्याच्या आधी भारतात लक्षावधी निर्वासित आश्रय घेत होते आणि पूर्वेइतकीच पश्चिम सीमाही तापत चालली होती. तेव्हा तो सगळा पेच पंतप्रधान इंदिरा गांधी आणि जनरल सॅम माणेकशा यांनी उत्तम हाताळून, नवा देशच जन्माला घातला. युद्धही निर्णायकपणे जिंकले. जवळपास तितकाच गंभीर पेचप्रसंग पश्चिम सीमेवर हळूहळू आकार घेतो आहे. एकाहून एक नामचीन अशा दहशतवाद्यांचे तालिबानी सरकार काबूलमध्ये सत्तेवर येत असताना, एकीकडे हतबल युरोप व नादानपणे वागलेली अमेरिका आणि दुसरीकडे, चीन-पाकिस्तान-तालिबान यांची मस्तवाल संभाव्य युती यांच्या कचाट्यात भारतासारखा शांतताप्रिय देश सापडतो आहे. ज्या तालिबान्यांचा पाडाव करण्यासाठी अमेरिकेने काबूलवर स्वारी केली; त्याच तालिबान्यांच्या हातात दोन दशकांनी तितकाच रक्तबंबाळ देश सोपवून, ही महासत्ता निसुगपणे निघून गेली आहे. दोन दशकांमध्ये तालिबानी बदलले आहेत असे म्हटले जात असले, तरी ते भारताच्या प्रत्यक्ष अनुभवाला अजून यायचे आहे. 'इस्लामिक अमिरात ऑफ तालिबान'चे नेतृत्व करणारा पंतप्रधान मुल्ला महंमद हुसेन अखुंद हा तालिबानचा संस्थापक मुल्ला ओमरचा जवळचा साथीदार. पाकिस्तानी मदरशात इस्लाम शिकलेल्या अखुंदनेच बमियाँच्या बुद्धमूर्तींच्या विद्धंसाचे नियोजन केले होते. संयुक्त राष्ट्रांनी जाहीर केलेल्या 'अत्यंत धोकादायक' दहशतवाद्यांच्या यादीत अखुंद तर आहेच; पण त्याच्या मंत्रिमंडळातील सहकारी मंत्रीही आहेत. 'हकानी नेटवर्क' या दहशतवादी संघटनेचा संस्थापक जलालुद्दीन हकानी याचा धाकटा मुलगा व नवा मंत्री अनस याने काश्मीरशी नव्या सरकारचा संबंध नाही असे म्हटल्यानंतर, लगेच तालिबानचा प्रवक्ता सुहेल शाहीन याने 'काश्मीरमधल्या मुस्लिमांचा प्रश्न मांडण्याचा हक्क आम्हाला आहेच,' असे म्हटले आहे. भविष्यात काय उत्पात होऊ शकतात, याची ही चुणूक आहे. भारताशी असणाऱ्या द्विपक्षीय संबंधांमध्ये पाकिस्तान गेल्या काही वर्षांमध्ये अनेक कारणांनी बचावात्मक पवित्र्यात गेला होता. पाकिस्तानची वाढती आर्थिक कोंडी हेही त्याचे एक कारण होते. दुसरीकडे, चिनी आगळिकीचा सीमेवर कडवट समाचार घेण्यात भारतीय सैन्याला यश आले होते; मात्र काबूलमध्ये पाकिस्तान आणि पर्यायाने चीनचेही कळसूत्री सरकार आल्याने, भारताच्या कटकटी वाढणार आहेत. दक्षिण आशियाच्या राजकारण आणि व्यूहरचनेत या घडामोडींमुळे पाकिस्तान व चीनचा अचानक वरचष्मा निर्माण झाला आहे. हे तिघे मिळून काश्मीरचे निमित्त पुढे करून, भारतात हिंसाचार घडविण्याचा प्रयत्न करतील. भारताशी असणाऱ्या मैत्रीचा व उद्याच्या जगाचा किंचितही विचार न करता, बायडेन यांनी हा अवसानघात केला आहे. इकडे आपण रशियाचेही घनिष्ट मित्र राहिलेलो नाही. या पार्श्वभूमीवर आता अखुंद सरकारशी संबंध जोडावे व राखावे लागणार आहेत. अफगाण जनतेला भारत अतिशय प्रिय आहे आणि त्यांना पाकिस्तान तितकाच अप्रिय आहे, ही यातली एकमेव जमेची बाजू आहे; मात्र तिथे सामान्य जनतेला किती किंमत आहे, ते निदर्शकांवर होणाऱ्या बेछूट गोळीबारातून दिसतेच आहे. अशा वेळी, तालिबानी राज्यकर्त्यांशी जमेल तसा संवाद वाढवत नेणे आणि अफगाणिस्तानच्या वाटचालीतील गेल्या दोन दशकांमधील हिस्सा कायम ठेवणे, हाच पर्याय दिसतो आहे. तोही पाकिस्तान व चीनला आवडणार नाहीच; मात्र आश्रित देशाला कर्जाच्या ओझ्याखाली बुडवून कायमचे अंकित करण्याची चिनी रीत भारत अवलंबत नाही. श्रीलंकेला हे समजते आहे. तालिबानी मंत्री कसेही असले, तरी अफगाण नोकरशाहीला हे निश्चितच समजत असणार. या शिवाय, तालिबानी सरकारची तऱ्हा अनेक मुस्लिम देश आणि विशेषत: शेजारच्या शिया इराणला मानवणारी नाही. बायडेन यांचे वागणे युरोपीय युनियनला बिलकुल आवडलेले नाही. विस्तारवादी चीनवर विशेष लक्ष ठेवणाऱ्या जपान आणि ऑस्ट्रेलियालाही हे पसंत नाही. हे सारे लक्षात ठेवून 'अखुंद सरकार'शी संबंध जोडतानाच, या सरकारवर अनेक प्रकारे दबाव टाकावा लागणार आहे. आज अफगाणिस्तानच्या पंजशीर प्रांतात जे काही घडते आहे; ते भारताची या प्रकरणातील कोंडी दाखविणारे आहे. पाकिस्तान सरळच आणि चीन अप्रत्यक्षपणे हा प्रांत तालिबानच्या टाचेखाली येण्यासाठी लागेल ती मदत पुरवत आहेत. यात त्या देशाचे सार्वभौमत्व कुठे राहिले? मात्र, तालिबानी सरकार आम्हीच चालवणार आहोत, असा एकंदरीत पाकिस्तानी गुप्तहेर यंत्रणा आयएसआयचा उद्दाम तोरा आहे. यामुळेच सरकारमध्ये जाऊन बसलेल्या तालिबानी दहशतवाद्यांना आयएसआय श्रीनगरच्या दिशेने पिटाळण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाही. एका बाजूला आयएसआयचे प्रमुख काबूलमध्ये जाऊन बसले असताना, अमेरिकेच्या सीआयएचे प्रमुख आणि रशियाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार दिल्लीत आले आहेत. या हालचाली सगळा देश तालिबान्यांच्या हातात देण्याआधीच व्हायला हव्या होत्या. 'आम्हाला तुमची चिंता समजते आहे,' इतकाच या भेटींचा सारांश आहे. तेवढ्याने भारतावर घोंघावत असणारे संकट दूर कसे होणार?



दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना सुनील वारगडा, भारत बनसोडे, प्रतिक वेदपाठक

### मा.उपमहापौर विक्रांत पाटील यांचा स्तुत्य उपक्रम

# शिक्षकदिनी गुरुवर्यांचा सन्मान





**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारताचे दुसरे राष्ट्रपती, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. शिक्षक दिनाचे औचित्य साधून नगर-सेवक विक्रांत पाटील यांनी प्रभागातील गुरुवर्यांच्या घरी जाऊन त्यांचा आदर सत्कार केला व त्यांचे आशीर्वाद घेतले.

नगरसेवक विक्रांत पाटील नेहमीच अशा अनोख्या उपक्रमांच्या माध्यमांतून प्रभागातील जनतेपर्यंत पोहोचण्यास तत्पर असतात. गेली वर्षोनुवर्षे शिक्षक अनेक विद्यार्थी घडवीत आले आहेत. त्यांचे हे कार्य अत्यंत मोलाचे व देशाच्या उन्नतीसाठी महत्वाचे असे राष्ट्रकार्य आहे. त्यामुळे त्यांचा सन्मान करण्याचे अहोभाग्य मिळणे हे माझे भाग्यच आहे. असे या उपक्रमाबद्दल बोलताना विक्रांत पाटील मत व्यक्त केले. नगरसेवक विक्रांत पाटील यांनी केलेल्या या सन्मानाने सर्व शिक्षक भारावून गेले व त्यांच्या डोळ्यांमध्ये आनंदाश्रू आले. विक्रांत पाटील यांनी शिक्षकदिनाच्या या उपक्रमाच्या माध्यमातून तमाम शिक्षकांच्या सेवेला सलाम केला.

# कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुरुड-जंजिरा शाखेतर्फे शिक्षक सन्मान सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई** : कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुरुड-जंजिरा शाखेतर्फे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा शाखाध्यक्ष संजय गुंजाळ यांच्या अध्यक्षतेखाली दि. ५ सप्टेंबर शिक्षकदिनी शिक्षक सन्मान सोहळा संपन्न झाला.

या सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुण्या दिपाली दिवेकर, कार्याध्यक्ष अरूण बागडे,माजी अध्यक्षा प्रतिभा जोशी ,डॉ. रविंद्र नामजोशी, सुनील मोहिले, कवी आशिष पाटील मान्यवर उपस्थित होते.सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्व-ागत करण्यात येऊन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्याध्यक्ष अरूण बागडे यांनी सरस्वती पूजन करून प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला आणि प्रास्ताविकात शिक्षक सन्मान सोहळा कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत प्रास्तविकात आपले विचार मांडले. सौ प्रतिभा मोहिले यांनी गजमुखा वंदन तुज पाहिले राजस तुझी या पदकमलावर सुमनावर वाहिले या गीताने गणेश वंदना केली.प्राथमिक शाळेतील सेवानिवृत्त मुख्याध्यापिका नैनिता कर्णिक,उषा खोत,वैशाली कासार,सर. एस ए हायस्कूल सेवानिवृत्त शिक्षक, तथा नगरपरिषदेचे पाणी पुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, कला शिक्षक रांगोळीकार महेंद्र पाटील,वसंतराव नाईक महाविद्यालयातील इंदिरा गांधी गोल्डन मेडल प्राप्त प्राध्यापक डॉ. मधुकर वेदपाठक सर यांना प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर यांच्या हस्ते शाल,श्रीफळ व सोनचाफ्याची फुले देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे औचित्य साधून यावेळी कराटेपटू प्रसाद चौलकर यांची आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.यावेळी गार्गि जोशी हिने कणा कविता सादर केली. दिपाली दिवेकर यांनी आपल्या भाषणात गुरू शिष्याचे नाते कसे अतुट असते. हे आपल्या आलेल्या अनुभवातून सांगितले व मला माझ्या गुरूजनांचा सत्कार करण्याचे भाग्य लाभल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रतिभा जोशी यांनी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विषयी माहिती सांगताना शिक्षकांनी नुसता शिक्षकी पेशा न समजता सेवा म्हणून या क्षेत्रात काम करावे.अशी भावना व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उर्मिला जोशी यांनी तर सिद्धेश लखमदे यांनी आभार मानले.

# खांदा कॉलनीत भर पावसात पाणीटंचाई ; रहिवाशी हैराण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भर पावसाळ्यात खांदा कॉलनीत प्रचंड पाणीटंचाई निर्माण झाली आहे. रहिवाशांना मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईला तोंड द्यावे लागले. विशेष म्हणजे मागील तीन ते चार महिन्यात हि परिस्थिती जैसे थेच आहे.एमजेपीच्या माध्यमातुन जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे आल्याने शहराला करण्यात येणारा पाणीपुरवठा थांबविण्यात आला होता. मात्र हि समस्या खांदा कॉलनी वासियांना नवीन नसल्याने येथील रहिवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. खांदा कॉलनीत सध्याच्या घडीला २० एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे.मात्र संपूर्ण शहराची तहान ८ ते १० एमएलडीवर भागवावी लागत आहे.मात्र हि समस्या अपुऱ्या पाण्याअभावी नसुन सिडको व एमजीपीच्या अधिकाऱ्यांमुळे असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. खांदा कॉलनीला पाणीपुरवठा करणाऱ्या एमजीपीच्या जलवाहिन्या पूर्णपणे जीर्ण झालेल्या आहेत. या जलवाजिन्यांना गळती देखील लागली आहे. खांदा कॉलनी शहराला मिळणार पाणी सिडको अधिकाऱ्यांना इतरत्र वळते केले असल्याने शहरात हि समस्या निर्माण झाली आहे. खांदा कॉलनी मधील ज्या सोसायट्यांना पिण्याच्या पाण्याबाबत समस्या उद्भवत आहे.पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या या भागात थेट पालिका पाणीपुरठा करीत नसली तरी पालिकेच्या माध्यमातुन पाणीपुरवठ्याच्या नियोजनावर संबंधित आस्थापनांना योग्य त्या सुचना देण्याची मागणी केली जात आहे.

# कळंबोली वसाहत परिसरातील बंद पथदिवे सुरू करण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहतीमधील काही ठिकाणी मुख्य रस्त्यावरील पथदिवे गेल्या काही दिवसा-पासून बंद असून आगामी सणासुदीच्या काळात ते बंद पथदिवे पुन्हा सुरू करावेत अशी मागणी शिवसेनेत केली आहे.

जिल्हा प्रमुख शिरीष घरत व महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांच्या आदेशाने आणि विधानसभा समनव्यक प्रदीप ठाकूर व शहर प्रमुख डी.एन.मिश्रा व उपमहानगर समन्वयन आत्माराम गावंड यांच्या मार्गदर्शनाने कळंबोली शहराच्या प्रवेशद्वारापासून म्हणजेच शिवसेना शाखा ते कामोठा बस स्टॉप,जाधव वाडी येथील सर्विस रोडवर कोणत्याही प्रकारची लाईटची सुविधा नाही, त्यामुळे संध्याकाळनंतर सदरील रोडवर मोठ्या प्रमाणात अंधार पसरतो त्यामुळे तेथून नोकरीवरून संध्याकाळी येणाऱ्या महिला वर्गांना सुद्धा मोठ्या प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागते व वळसा मारून कळंबोली वसाहतींमध्ये यावे लागते. तसेच सदरील सर्विस रोडवर अंधार असल्यामुळे एखाद्या गुन्हा घडण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही. या संदर्भात आज रायगड भवन, बेलापूर येथील कार्यकारी अभियंता कांबळे यांना निवेदन दिले व सदरील प्रकरणात लक्ष घालून वरील सर्विस रोड वर त्वरित स्ट्रीट लाइट चालू करावेत जेणेकरून नागरिकांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळेल अशी मागणी केली. यावेळी शहर समन्वयक गिरीश धुमाळ, अक्षय साळुंखे शहर संघटक, नारायण फडतरे उपशहर प्रमुख, सुर्यकांत म्हसकर उप शहर प्रमुख, आकाश शेलार विभाग प्रमुख, नागेश शेळके शाखा प्रमुख, उप शाखा प्रमुख अनिकेत कन्हेरे उपस्थित होते. या मागणीची दखल घेवून लवकरच पथदिवे सुरू करतो असे आश्वासन देण्यात आले आहे.

# स्थायी समितीच्या सभेत छत्रपती संभाजी महाराज क्रीडा मैदान विकसित करण्याच्या कामाला मंजुरी

### विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी केली होती मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा गुरुवार ९ सप्टेंबर रोजी ऑनलाइन बैठकीचे आयोजन करण्यात आले होती. यावेली स्थायी समितीच्या सभेत छत्रपती संभाजी महाराज क्रीडा मैदान विकसित करण्याच्या कामाला मंजुरी देण्यात आली, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी याबाबत मागणी केली होती



दि.०९ सप्टेंबर रोजी झालेल्या पनवेल महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत विविध विकास कामांना मंजुरी देण्यात आली. यात प्रामुख्याने पालिका मुख्यालय लगतचा छत्रपती संभाजी महाराज क्रीडा मैदान विकसित करण्याच्या कामाला मंजुरी देण्यात आली आहे.

पालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी छत्रपती संभाजी महाराज मैदान विकसित करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. तसेच पनवेल महापालिका हद्दीतील काही प्रमुख रस्त्यांचे काँक्रीटीकरण व डांबरीकरणाच्या कामांना देखील या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी मागणी केलेल्या प्रभाग क्र.१८ मधील अग्निशमन केंद्र इमारत ते डॉ. मौलाना आझाद केंद्रापर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, झवेरी बाजार, बालाजी मंदिर परिसरातील रस्ता काँक्रीटीकरण व साईनगर येथील रस्ता काँक्रीटीकरणाच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या नगरसेविका प्रज्योती म्हात्रे यांच्या प्रभाग क्र.९ अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे या कामाला स्थायी समिती सभेत मंजुरी मिळाली आहे. तसेच नगरसेविका उज्वला विजय पाटील यांच्या प्रभाग क्र.२ मधील नागझरी गावातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण या कामाला देखील मंजुरी मिळाली आहे.

> छत्रपती संभाजी महाराज क्रीडा मैदान विकसित करण्यासाठी २०१७ पासून पाठपुरावा करत आहे. आज अखेर स्थायी समिती बैठकीत या विषयाला मंजुरी देण्यात आली आहे. तसेच पालिका हद्दीतील काही प्रमुख रस्त्यांचे डांबरीकरण व काँक्रीटीकरणाच्या विषयांना देखील मंजुरी दिली आहे.
>
> **प्रितम जनार्दन म्हात्रे, विरोधी पक्षनेते, पनवेल महापालिका**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## कळंबोली सर्कलचा होणार विस्तार

येऊन प्रस्तावित नवी मुंबई विमानतळाच्या सीमाभागातील रस्ते विकसित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यामधील पॅकेज ४पर्यंतची कामे पूर्ण झाली असून पॅकेज ५मध्ये कळंबोली सर्कल आणि विमानतळाच्या वहाळ बाजूकडील 'एग्झिट' वर रोटरी प्रकारचे चक्राकार बेट तयार करण्याचे प्रस्तावित आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन नितीन गडकरी यांनी मंगळवारी दिल्लीत बैठक आयोजित केली होती. या बैठकीला सिडको, जेएनपीटी आणि एनएचएआयचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. सध्या असलेल्या सल्लागारासोबत आंतरराष्ट्रीय दर्जाचा सल्लागार घेऊन पुढील २० वर्षे पुन्हा नूतनीकरणाची गरज लागणार नाही, असे नियोजन करण्याचा सल्ला गडकरी यांनी उपस्थितांना दिला. कळंबोली येथे बेट विकसित करताना सिडकोच्या जागेची गरज लागणार असल्यामुळे सिडकोने जागा इतर कारणांसाठी न देता यासाठी राखीव ठेवावी, अशा सूचनादेखील दिल्या. लवकरच पनवेलकरांची वाहतूक कोंडीतून मुक्तता करणार असल्याचे नामदार नितीन गडकरी यांनी बैठकीत सांगत पनवेलकरांना मोठा दिला आहे.

## महिला पोलिसाने दिली सहकाऱ्याच्या हत्येची सुपारी ; आरोपी अटकेत

गुन्ह्यात वापरलेली नॅनो कार सुद्धा पोलिसांनी हस्तगत केली आहे. सखोल तपासामध्ये शिवाजी सानप हे जेथे कार्यरत होते. त्या ठिकाणी महिला पोलीस शिपाई शितल पानसरे या सुद्धा कार्यरत होत्या. त्यांच्या दोघांमध्ये ओळख होती. परंतु त्यांच्यात झालेल्या वादाचा मनात राग धरुन सुड घेण्याच्या उद्देशाने आरोपी शितल पानसरे हिने तिच्या घरात घरकाम करणारा विशाल जाधव व त्याचा मित्र गणेश चव्हाण यांना पैसे देवून त्यांची मदत घेवून जीवे ठार मारण्याचा कट रचून तो यशस्वी केला. परंतु पोलिसांनी सखोल चौकशीद्वारे यांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये प्रामुख्याने अजयकुमार लांडगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे, पोनि विजय कादबाने, पोनि संजय जोशी, सपोनि देवळे, सपोनि, हुलगे, सपोनि पवार, सपोनि दळवी, पोउपनि फरताडे, पोहवा राउत, पोहवा वाघमारे, पोहवा गथडे, पोना म्हात्रे, पोशि खेडकर, पोना राठोड, पोना राउत, पोना पारासुर, पोना साळूखे, पोना देशमुख, पोना पाटील नमुद गुन्हयाचे मुळापर्यंत जावून अतिउत्कृष्ट तपास करुन चांगली कामगिरी केली आहे. याबाबत अजूनही काही आरोपी असण्याची शक्यता असल्याने त्या दृष्टीने पनवेल शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# पोलादपूर येथील स्वामी कवींद्र परमानंद मठात कोविड लसीकरणाचे शिबीर

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलादपूर तालुक्यात मुंबई, पुणे व राज्याच्या अन्य भागातून मोठ्या संख्येने गणेशभक्त चाकरमान्यांचे सहकुटूंब आगमन झाले असल्याने कोरोना संसर्गाची शक्यता वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणात लस उपलब्ध झाल्यामुळे सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविणाऱ्या प्रसाद इंगवले यांच्या माध्यमातून केवळ १५ तासांच्या कालावधीत लसीकरण शिबिराचे आयोजन करण्याचे ठरले आणि त्यास पोलादपूरकरांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. यापुढेही गणेशोत्सव काळामध्ये शहरामध्ये लसीकरण करण्यासाठी स्वामी कवींद्र परमानंद मठामध्ये शिबिराचे आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही ग्रामीण रूग्णालय पोलादपूरच्या वैद्यकीय अधिक्षिका डॉ.भाग्यरेखा पाटील यांनी दिली.

यावेळी स्थानिक माजी नगरसेविका संगिता इंगवले, सहायक अधिक्षक नितीन पाचनर्गे, समन्वयक राजेश वोसावे, परिचारिका अश्विनी चिपळूणकर, बांधिलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रसाद इंगवले तसेच प्रमुख पाहुणे पत्रकार शैलेश पालकर आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे पत्रकार शैलेश पालकर यांनी प्रसाद इंगवले यांना गेल्या अनेक वर्षांपासून पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाम ध्ये गरजू गरीब रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना जेवणाचा डबा मोफत देण्याची सेवा मनापासून करताना पाहिले. गेल्याचवर्षी त्यांचे आजोबा बाप्पा इंगवले यांचे कोरोना काळात निधन झाल्याने आजचे लसीकरण शिबिर आयोजित करण्यासाठी त्यांचा पुढाकार हा सामाजिक बांधिलकीतून दिसून येत असल्याचे सांगून पोलादपूर तालुक्यातील आबालवृध्द स्त्रीपुरूषांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले. दिवसभरामध्ये कोविशिल्डचे पहिले आणि दुसऱ्या डोसचे १०० जणांना लसीकरण तर कोवॅक्सीनचे दुसऱ्या डोसचे १५ जणांना लसीकरण करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# खोपटे प्राथमिक शाळेच्या इमारतीचे बांधकाम सुरू करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : बांधपाडा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून खोपटे येथिल रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळेची जुनी इमारत तोडून जवळजवळ एक वर्ष होत आला आहे. त्या जागेवर त्वरित शाळेची नवीन इमारत व्हायला पाहिजे होती. मात्र त्या जागेवर अद्यापही कोणत्याही प्रकारचे काम सुरू झाले नाही. सदर प्राथमिक शाळेची ईमारत सी एस आर फंडांतून दुबई पोर्ट (एनएसआयसीटी) या कंपनीच्या माध्यमातून बांधण्यात येणार असल्याची प्राथमिक चर्चा ग्रामपंचायत आणि शालेय शिक्षण कमिटीच्या चर्चासत्रात झाली होती.

मात्र अजूनही प्राथमिक शाळेच्या इमारतीचे काम सुरू झाले नाही.महाराष्ट्र शासनाच्या जी.आर नुसार लवकरच शाळा सुरू होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आणि शिक्षकाना शिकवण्यासाठी वर्ग तर पाहिजेत. त्यामुळे महत्वाची गरज ओळखून खोपटे गावचे ग्रामस्थ आणि ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुजित म्हात्रे, रितेश ठाकूर ग्रा. पं. सदस्य, जागृती घरत, ग्रा.पं. सदस्या, भावना पाटील ग्रा.पं.सदस्या, राजश्री पाटील ग्रा.पं.सदस्या, करिष्मा म्हात्रे ग्रा.पं. सदस्या, शुभांगी ठाकूर ग्रा.पं. सदस्या यांनी तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी उरण, सभापती उरण पंचायत समिती, निलम गाडे गटविकास अधिकारी उरण यांच्याकडे एका निवेदनाद्वारे देऊन प्राथमिक शाळा खोपटे ह्या शाळेच्या इमारतीचे लवकरात लवकर काम सुरू करावे अशी मागणी केली आहे.



शाळा सुरु झाल्यास मुलांना कुठे बसविणार? शिक्षक विद्यार्थ्यांना कसे शिकविणार? विद्यार्थी किती दिवस पर्यायी जागेत शिकतील? हा मोठा प्रश्न असून शाळेमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात असल्याने लवकरात लवकर शाळेचा प्रश्न निकाली काढावा अशी लेखी मागणी पत्रव्यवहाराद्वारे विविध संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना करण्यात आल्याची माहिती उपसरपंच सुजित म्हात्रे यांनी दिली आहे.

> विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी सध्या ४ वर्गांची पर्यायी व्यवस्था तिथेच बाजूला केलेली आहे. जोपर्यंत शाळेच्या नवीन इमारतचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत विद्यार्थी या ४ रूम मध्ये शिकणार आहेत. विद्यार्थ्यांचे शिक्षण चालूच राहील.शाळेचे नवीन इमारतीसाठी प्रयत्न सुरू आहेत.
>
> **निलम गाडे, गटविकास अधिकारी**
> **पंचायत समिती उरण**

## संक्षिप्त...

### नांदगावमध्ये लाईफ केअर क्लिनिकचे उदघाटन




**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरूड तालुक्यातील नांदगाव येथे डॉ.आयमन हसवारे यांच्या लाईफ केअर क्लिनिक चे उदघाटन डॉ.सिराज हसवारे यांच्या हस्ते सुभाष महाडिक यांच्या अध्यक्षतेखाली ॲड.इस्माईल घोले यांच्या निवासस्थाना नजिक करण्यात आले.

यावेळी आयोजित कार्यक्रमाप्रसंगी नांदगावचे माजी सरपंच मुअज्ञम हसवारे, उपसरपंच अस्लम हलडे, पंचक्रोशी अध्यक्ष फैरोज घलटे, डॉ.इकबाल हसवारे, डॉ. विश्वास चव्हाण, निजामुद्दीन अनवारे, अहंमद हसवारे, इरफान हलडे, अमिर हसवारे, इब्राहिम घलटे, अजिज मुकरी, बाबम्या शिरसिकर, मुख्त्यार सोंडे, सज्ञाद हसवारे, नवशाद घलटे, अनिस घलटे, इम्रान घलटे, मतीन हसवारे यांसह नांदगाव मजगांव पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

सुरुवातीला उपसरपंच अस्लम हलडे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी पवित्र कुराण चे पठण करण्यात आले. शेवटी मुहीत हसवारे यांनी आभार मानले.



**आरती संग्रहाचे प्रकाशन पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या हस्ते झाले. यावेळी कुंदा पवार सरपंच वाकडी, नामदेव जमदाडे माजी सरपंच, पत्रकार मयुर तांबडे, बाळू पवार उपस्थित होते.**

# पोलादपूर शहरातून पोलीसांचा लाँगमार्च

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शहरातील महाबळेश्वर रस्ता आणि बाजारपेठेमधून महाड उपविभागीय पोलीस अधिक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरूवारी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लाँगमार्चचे आयोजन करण्यात आले. यावेळी पोलादपूरचे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव आणि चार उपनिरिक्षक तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

पोलादपूर शहरामध्ये गर्दीच्या पार्श्वभूमीवर कोरोनाचा प्रभाव वाढू नये, यासाठी पोलीस जीपमधून जाहिर आवाहन करण्यात आले. यावेळी पोलादपूर येथील छ.शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्यापासून महाबळेश्वर रस्ता व शिवाजीनगरपासून पोलादपूर शहरातील बाजारपेठ असा लाँगमार्चचा मार्ग होता. पाच पोलीस जीपदेखील यामध्ये सहभागी झाल्याने पोलादपूर शहरातील नागरिकांमध्ये या लाँगमार्चचे विशेष आकर्षण निर्माण झाले असून या आवाहनानुसार आगामी गणेशोत्सवकाळामध्ये कोणत्याही प्रकारे कोरोनाच्या तिसऱ्या लाटेला प्रतिबंध करण्यासंदर्भात नागरिक सतर्क राहण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

# पनवेल तालुक्यातून देशी दारुचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील मोठे धामणी परिसरातून देशी दारुचा साठा हस्तगत केला आहे.

मोठी धामणी येथे मोठ्या प्रमाणात देशी दारुच्या प्लॅस्टीकच्या बाटल्या ज्याची किंमत जवळपास ६ हजार रुपये इतकी आहे.

तेथील एका घराच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत ठेवली असल्याची माहिती वपोनि रवींद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि.(गुन्हे) अंकुश खेडकर, सपोनि नितीन पगार, पोलीस उपनिरीक्षक आकाश पवार, पो.हवा.अमोल कांबळे, पो. नाईक बाळकृष्ण अधिकारी आदींच्या पथकाने त्या ठिकाणी छापा मारुन सदर माल हस्तगत केला आहे.

# ग्रुप ग्रामपंचायत पारगावने केले १७० जणांचे मोफत लसीकरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत पारगावने राज्य शासनाच्या नवीन धोरणाचा अवलंब करून परिसरातील १७० जणांचे मोफत लसीकरण केले असून यासाठी सरपंच अहिल्या बाळाराम नाईक यांनी शासनासह जिल्हा परिषदेकडे व आरोग्य खात्याकडे पाठपुरावा करून या लस उपलब्ध करून घेतल्या आहेत.

कोव्हिशिल्ड व कोव्हॅक्सिन लसीचा पहिला व दुसरा डोस परिसरातील ग्रामस्थांना देण्यात आला. सोशल डिस्टंसिंग पाळून मास्क लावून वय वर्षे १८ ते ४५ वरील व्यक्तींना डोस देण्यात आले. यावेळी प्रामुख्याने आधारकार्ड तापासण्यात आले व त्याची नोंदही करण्यात आली. याचा लाभ १७० जणांनी घेतला आहे. यासाठी सरपंच अहिल्या बाळाराम नाईक यांनी विशेष प्रयत्न केले व कोणताही भेदभाव न करता सरसकट सर्वांना लसीचे डोस देण्यासाठी प्रयत्न केला. याकामी त्यांना वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता पाटील, उपसरपंच अंजली कांबळे, मा. उपसरपंच सुशील तारेकर, मा. उपसरपंच मनोज दळवी, सदस्या निशा पाटील, सुनंदा नाईक, बानुबाई म्हात्रे, सोनाली भोईर, शिल्पा नाईक, कल्पना तारेकर, सदस्य विश्वनाथ पाटील, विजय वाघे, डॉ. भारती आशा तारेकर, प्रमोद म्हात्रे, सोनाली देशमुख, चंद्रभागा तारेकर, देवळे आदींचे सहकार्य लाभले आहे. या उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी सरपंच अहिल्या बाळाराम नाईक यांचे कौतुक केले आहे.



# नगरसेवक संदीप कदम यांच्या प्रयत्नातून मंदिराचे सुशोभीकरण



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील भारतीय जनता पक्षाचे विद्यमान नगरसेवक संदीप कदम यांच्या प्रयत्नांनी येथील रेल्वे स्थानकाला लागून असलेल्या माथेरानचे ग्रामदैवत यांचे प्रति पिसारनाथ मंदिराचे जिर्णोद्धार व परिसर सुशोभीकरणाचे काम करण्यात आले.

माथेरानमधील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या माथेरान रेल्वे स्थानकाला लागून असलेल्या प्रति पिसारनाथ महाराजांच्या मंदिराची अवस्था बिकट झाली होती गाभारा व मंडप परिसरात सर्वत्र जमीन उकरली गेल्याने परिसराला विद्रुपीकरण आले होते.

ह्या मंदिरावर रेल्वे कर्मचारी व परिसरातील लोकांची श्रद्धा असल्याने येथील नगरसेवक संदीप कदम यांनी हा परिसर सुशोभीकरण करण्याचा विडा उचलला होता त्यास नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांची साथ लाभल्याने हा परिसर ऐन सणासुदीमध्ये सुशोभित झाला आहे त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतोषाचे वातावरण आहे.

# खोपोली नगरपालिकेच्या वतीने लसीकरणावर भर

## लसीकरणाच्या पुरवठा वाढविला दोन सेंटरवर लसीकरण सुरू

**दै.रायगड नगरी । राज साळुंके**

**खोपोली** : खोपोली शहरात कोरोना व्हायरस या महामरीच्या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाच्या आदेशानुसार नगरपालिकेच्या माध्यमातून विविध उपाययोजना करीत नियंत्रण मिळविण्यात यश मिळाले असले तर पहिल्या व दुसऱ्या लाटे नंतर आता शासनाने तिसऱ्या लाटेचे संकेत दिल्याने मागील सहा महिन्यांपासून या आजाराला रोखण्यासाठी लसीकरण सुरू केले. मात्र शासनाकडून जशा लस उपलब्ध होतील त्याप्रमाणे लसीकरण सुरू होते. मात्र आता तिसऱ्या लाटेचे संकेत मिळाल्याने आदिक लस उपलब्द व्हावी यासाठी पाठपुरावा सुरू होता. त्यामुळे आता लसीकरणाची मोहीम अधिक प्रभावी करण्यासाठी खोपोली नगरपालिका हॉस्पिटल सह अन्य दोन लसीकरण सेंटर वाढविण्यात आले असून अपंग व्यक्तींना रुग्णालयात प्रथम प्राधान्याने लसीकरण करण्यासाठी पालिकेने पाऊले उचलली असल्याची माहिती खोपोली पालिकेने दिली आहे.

खोपोली शहरात मागील दीड वर्षांपासून कोरोना व्हायरस या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी नगरपालिकेच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे काही प्रमाणात या आजाराचे रुग्ण कमी झाले आहेत. मात्र सध्या या आजाराचे समूळ नष्ट करण्यासाठी लसीकरणाची मोहीम शासनाने सुरू केली आहे. मात्र लस कमी प्रमाणत उपलब्ध होत असल्याने नगरपालिका रुग्णालयातच लसीकरण सुरू होते तर आता शासनाने तिसऱ्या लाटेचे संकेत दिल्याने लसीकरण ही प्रत्येकाला सुरक्षा कवच म्हणून उपयुक्त ठरणार असल्याने शासनाकडे लसीचा अधिक पुरवठा व्हावा अशी मागणी केली जात असताना शासनाकडून अधिक लसीचा पुरवठा होत असल्याने खोपोली शहरात १८ वर्षावरील सर्व नागरिकांना लसीकरण पूर्ण करण्यासाठी र. वा दिघे वाचनालय पाटणकर चौक व एनयुएचएम दवाखाना शिळफाटा येथे दोन नविन लसीकरण केंद्रांची सुरुवात करण्यात आली आहेत. या ठिकाणी ही लसीकरण मोहीम सुरू करण्यासाठी डॉक्टर कर्मचारी टीम उपलब्ध करून लसीकरण सुरु केले आहे.



या दोन्ही ठिकाणची पाहणी करण्यासाठी खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गणेश शेटे यांनी या लसीकरण केंद्रावर जाऊन पाहणी केली. त्यावेळी त्यांनी रांगेत उभे असलेल्या नागरीकांशी संवाद साधला तसेच लसीकरण केंद्रावर असलेल्या कर्मचारी यांना सुचना केल्या.

# मुरुडमध्ये भारतीय तटरक्षक दलाच्या जवानांचे सेवाकार्य

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड मधील कोटेश्वरी मंदिर ते नाबाबच्या राजवाड्यामधील रस्त्याच्या कडेला नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे वाहून आलेला कचरा व माती साठल्यामुळे पाण्याचा निचरा होत नव्हता व पाणी आडल्यामुळे सर्व पाणी रस्त्यावर येत होते. त्यामुळे तेथे शेवाळ व चिखल रस्त्यावर येऊन रस्ता निसरडा झाला होता. यामुळे दुचाकी वाहने घसरून अपघात होण्याची दाट शक्यता होती. मागील अतिवृष्टीमध्ये याच परिसरात दोन दुचाकीस्वारांचा अपघात झाला होता. ही गंभीर बाब तेथून प्रवास करताना भारतीय तटरक्षक दलाचे अधिकारी अजित सिंग यांच्या लक्षात येताच त्यांनी त्वरित तटरक्षक दलाच्या मुरुड शाखेतील जवानांमार्फत सदरचा परिसर स्वच्छ करून पाण्याचा मार्ग मोकळा केला. हे काम आमच्या खात्यात येत नसून केवळ परिस्थितीच गांभीर्य ओळखून अपघात टाळण्यासाठी आम्ही हे सेवाकार्य केल्याचे तटरक्षक दलाचे अधिकारी अजित सिंग यांनी सांगितले.


### जाहीर नोटीस

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र.एमएच-४६-एक्स-१४५८ चे मालक विवेक व्ही वेंगुर्लेकर यांचे तारीख १३/०५/२०२० रोजी निधन झालेले आहे. तसेच अंजली विवेक वेंगुर्लेकर यांचे तारीख १८/०५/२०२१ रोजी निधन झालेले.

माझे अशिल विकास विवेक वेंगुर्लेकर, पत्ता : फ्लॅट नं.०५, अनुराधा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.१८, से.१, महात्मा स्कूल ग्राऊंडच्या मागे, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, जि.रायगड

उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी माझे अशिल असल्यामुळे सदर वाहनाचा वापर करण्याचा माझ्या अशिलांचा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या वाहनाचे माझ्या अशिलांच्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी माझे अशिलांनी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

याबाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत खालील सही करणार यांच्याकडे नोंदवावी.

**सही/-**
**ॲड.शुभांगी केदार लाड**
**पत्ता : बी १०१, रिद्धी सिद्धी को.ऑप.हौ. सोसा, स्वामी नित्यानंद मार्ग, पायोनिअर विभाग, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**



अर्जदाराचे वकील
ॲड.अक्षय सुरेश भोईर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रिमिनल एम.ए.नं.८१०/२०२१

श्री.सुरेश शमा पाटील
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती
रा.घर क्र.२३९, कृष्ण मंदिराजवळ,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.संभु कानू पाटील तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड यांचा मृत्यू दि.०७/०४/१९४७ रोजी झालेला आहे. परंतु मृत्यूची नोंद पनवेल महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू नोंदणी पुस्तिकेत मृत्यूची नोंद केलेली नाही. तरी ती करून मिळावी याकरिता अर्जदार यांनी उशिरा मृत्यूनोंदीचा आदेश मिळावा यासाठी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

आज तारीख ०८/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल



नमुना क्र.७५

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग रायगड
जा.क्र.न्यायशाखा/११७६/२०२१
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग, अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि.रायगड
दि.९/९/२०२१

### चौकशीची जाहीर नोटीस

संस्था नोंदणी अर्ज क्रमांक : २७१/२०२१
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : STUDENTS FIRST EDUCATIONAL TRUST जि.रायगड
...बाबत
श्रीम.VARSHA BIPIN GANAR ...अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम १०००/- रुपये

ब) स्थावर मिळकत :- (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड यांचे शिक्क्यानिशी आज दि.९/९/२०२१ रोजी दिली.

**सही/-**
**(श्रीम.अंजली रमेश पिसाळ)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड विभाग रायगड**



मे.मुजावर सो

ॲड.हिमानी दिवेकर
अर्जदार तर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२१३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/१०/२०२१

१) श्रीमती.पदमूबाई लक्ष्मण पाटील
वय वर्षे : ७३, धंदा : घरकाम
रा.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.मच्छिंद्र सोमा ठाकूर
वय वर्षे : ५४, धंदा : व्यवसाय
रा.घोडबंदर गांव, एम.टी.डी.सी.बंगलो जवळ,
मीरा भायंदर, ठाणे ४०११०७
३) श्री.विश्वनाथ सोमा ठाकूर
वय वर्षे : ५८, धंदा : व्यवसाय
रा.रुम नं.२, ठाकूर चाळ, किल्ला रोड
घोडबंदर ग्राम, नियर एम.टी.डी.सी.गेस्ट हाऊस
मीरा रोड, भायंदर, ठाणे ४०११०७ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.सोमा भोका ठाकूर या हयात असताना त्यांच्या नावे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| न्हावे | ४६६ | अ | १४७ | ००-२८-१२<br>पो.ख.००-००-४<br>एकूण ००-२९-६ |

कै.सोमा भोका ठाकूर हे दि.२४/१०/१९८५ रोजी मौजे : जासई येथे मयत झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने/नी/आपली/ल्या लेखी हरकत/ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर करावयात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

आज दि.९/९/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

## संक्षिप्त...

### विनामूल्य शस्त्रक्रियासाठी बचत रक्कम ठरणार संजीवनी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथील ‘श्री सत्य साई संजीवनी हॉस्पिटल’च्या छतावर (दि.०३ सप्टेंबर) इंडसइंड बँकेने सोलर पॅनेल बसविले. ही एक ‘लार्ज स्केल ग्रिड सोलर फोटोव्होल्टिक सिस्टीम’ असून ती सुमारे ३०० किलोवॅट पीक (केडब्ल्यूपी) इतकी वीज निर्मिती करील. त्यामुळे कार्बन उत्सर्जन ३४० मेट्रिक टनांनी कमी होईल. शिवाय, यामुळे रुग्णालयाच्या वीजवापराच्या खर्चात वर्षाकाठी सुमारे ६० लाख रुपयांची बचत होणार असून ही बचत रक्कम जन्मजात हृदयविकाराने ग्रस्त ४० मुलांच्या हृदयावरील विनामूल्य शस्त्रक्रियांसाठी संजिवनी ठरणार आहे.

’श्री सत्य साई हेल्थ अँड एज्युकेशन ट्रस्ट’चे अध्यक्ष सी. श्रीनिवास आणि ‘इंडसइंड बँके’च्या कॉर्पोरेट व इन्व्हेस्टमेंट बँकिंग, सीएसआर व सस्टेनेबल बँकिंग या विभागांच्या प्रमुख रूपा सतीश यांच्या हस्ते पॅनेल बसविण्याच्या कामाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे व ट्रस्टचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार सुनील गावस्कर हे या रुग्णालयाच्या विश्वस्तांपैकी एक असल्याने, ते ‘व्हर्च्युअल प्लॅटफॉर्म’च्या माध्यमातून उद्घाटन सोहळ्यास उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल बोलताना ‘इंडसइंड बँके’च्या कॉर्पोरेट व इन्व्हेस्टमेंट बँकिंग, सीएसआर व सस्टेनेबल बँकिंग या विभागांच्या प्रमुख रूपा सतीश म्हणाल्या, आमचे प्रभावक्षेत्र आर्थिक परिसंस्थेच्या पलिकडे आहे, असे आम्ही इंडसइंड बँकेत मानतो. एक संस्था म्हणून आम्ही अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरणाच्या उन्नतीसाठी समप्रमाणात कटिबद्ध आहोत. ‘श्री सत्य साई संजीवनी हॉस्पिटल’मध्ये सोलर पॅनेल आम्ही बसविले, यातून आमची ही कटिबद्धता दिसून येते. या उपक्रमामुळे, कार्बन उत्सर्जन कमी करण्यामध्ये आमची रुग्णालयाला मदत होत आहेच; त्याशिवाय हृदयविकार असलेल्या मुलांवर शस्त्रक्रिया करण्यातही आमचा हातभार लागत आहे. अशा उदात्त कारणांसाठी योगदान देणे आणि स्वतःहून त्यात भागीदार होणे हा बँकेने नेहमीच आपला सन्मान मानला आहे, आणि भविष्यातही बँक असेच करत राहील.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# १५ वर्ष वेतनापासून वंचित शिक्षकांना-शिक्षणमंत्र्यांनी दिला आशेचा किरण

## शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी घेतली शिक्षणमत्रांची भेट

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मागील १५ वर्षांपासून वेतनापासून वंचित असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील, वाढीव पदावरील शिक्षकांच्या पदांना तात्काळ मान्यता देऊन वेतन सुरू करणे बाबत आज शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली सर्व शिक्षक आमदारांनी शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड यांची मंत्रालयात भेट घेतली. उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पदाला तात्काळ मान्यता देऊन वेतन सुरू करण्याबाबत निर्णय घेण्याबाबत चर्चा करण्यात आली. या बाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन शिक्षणमंत्र्यांनी आमदारांच्या शिष्टमंडळाला दिले.



कनिष्ट महाविद्यालयाच्या शिक्षकांच्या वेतन बाबत निर्णय घेण्यासंदर्भात शालेय शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड यांना मेलद्वारे बाळाराम पाटील यांनी आधीच निवेदन निवेदन होते. त्या नुसार आज मंत्रालयत शालेय शिक्षण मंत्री वर्षा ताई गायकवाड यांच्या दालनात बैठकीचे आयोजिन करण्यात आले होते. शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांचे विविध प्रश्न व प्रश्नांचे निराकरण करण्यासंदर्भात शिक्षक आमदार व शिक्षणमंत्र्यांन सोबत झालेल्या बैठकीत शिक्षकांच्या हिताबाबत योग्य निर्णय घेण्यात आले. यावेळी आमदार बाळाराम पाटील, आमदार सुधीर तांबे, आमदार अभिजित वंजारी, आमदार जयंत आसगावकर, आमदार विक्रम काळे, आमदार किरण सरनाईक, अतिरिक्त मुख्य सचिव (शालेय शिक्षण) वंदना कृष्णा, शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी, संचालक एम.डी. सिंग, अप्पर मुख्य सचिव एम.डी. जगताप आदी उपस्थित होते.

# माथेरानमध्ये स्व.पत्रकार संतोष पवार यांच्या स्मरणार्थ चौकाचे नामकरण



**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : माथेरानचे दिगवंत पत्रकार संतोष पवार यांचा आज प्रथम स्मृती दिनानिमित्त येथील पंचवटी नगर येथील चौकास त्यांचे नाव देऊन नामकरण करण्यात आले.

मागील वर्षी गणेशोत्सव काळामध्ये आलेल्या कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये माथेरानचे पत्रकार संतोष पवार यांचे नउ सप्टेंबर रोजी निधन झाले होते त्याचा शोक संपूर्ण माथेरानमध्ये करण्यात आला होता. पत्रकारीता क्षेत्रात अठ्ठावीस वर्षे काम करताना त्यांनी माथेरानचे अनेक प्रश्न शासन दरबारी पोहचविण्याचे काम केले होते. त्यामुळे त्यांचा माथेरानमध्ये आदर होता. त्याचमुळे त्यांच्या नावाने येथे येथे माथेरान प्रेस क्लब व माथेरानचे दैनिक पुढारीचे निर्भीड पत्रकार मिलिंद कदम यांनी त्यांचे नाव येथील रस्ता किंवा चौकास द्यावे अशी मागणी केली होती. त्यास माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देताना येथील पंचवटी नगर येथील चौकास त्यांचे नाव देण्याचे पालिकेकडून जाहीर केले. त्याचे भूमिपूजन आज उपनगराध्यक्ष आकाश चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले ह्या–वेळी उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ह्यावेळी संतोष पवार यांच्या कुटुंबियांसोबत माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, नगरसेवक शिवाजी शिंदे, चंद्रकांत जाधव नगरसेविका सोनम दाभेकर, कार्यतत्पर वनसमिती अध्यक्ष योगेश जाधव, कुलदीप जाधव, प्रकाश सुतार, संजय अभंगे, गणेश पवार व माथेरान मधील असंख्य नागरिक उपस्थित होते. यावेळी संतोष पवार यांची स्मृती कायम स्मरणात राहावी यासाठी महात्मा गांधी मार्गावरील भागात वृक्षारोपण करण्यात आले.

### पोलादपूर तालुकावासीयांनी गणेशोत्सवकाळात कोविडसंदर्भात सतर्क रहा

# अतिवृष्टी काळातील नुकसान भरपाईसाठी पाठपुरावा जोरदार : आ.भरत गोगावले

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : येत्या गणेशोत्सव काळामध्ये कोविड–१९ची तिसरी लाट येऊ नये यासाठी सर्वच नागरिकांनी सतर्कता बाळगण्याची गरज असून अतिवृष्टी काळात भूस्खलन झालेल्या तसेच महापुरामध्ये वाहून गेलेल्या नळपाणी योजना, रस्ते, विहिरी, शाळा व सरकारी इमारती तसेच खासगी मालमत्ता व शेती आदींच्या नुकसानभरपाईसाठी आपण राज्याच्या महाआघाडी सरकारचा आमदार म्हणून जोरदार पाठपुरावा करीत असल्याची ग्वाही महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी दिली.

पोलादपूर शहरातील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये घेतलेल्या आढावा बैठकीवेळी आ.गोगावले यांच्यासमवेत प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसिलदार दिप्ती देसाई, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, पंचायत समितीचे सदस्य यशवंत कासार, तालुकाप्रमुख निलेश अहिरे,डॉ.गुलाबराव सोनावणे, गटविकास अधिकारी जगताप आदी व्यासपिठावर उपस्थित होते.

यावेळी विविध सरपंच, ग्रामसेवक तसेच विविध विभागाचे अधिकारी यांनी अतिवृष्टीकाळातील हानीची आकडेवारी आ. गोगावले यांना दिली. यावेळी आ.गोगावले यांनी महाड विधानसभा मतदार संघाचा सत्त–ाधारी पक्षाचा आमदार म्हणून आपण येत्या काही दिवसांमध्ये महाड आणि पोलादपूर तालुक्यातील नुकसानीबाबत सर्वतोपरी प्रयत्न करीत राज्यातील महाआघाडी सरकारकडून मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त करून जे गेले ते सर्व नव्याने उभारण्यासाठी आग्रही राहू, असे उपस्थितांना सांगितले. प्रांताधिकारी व तहसिलदार यांनी विविध मालमत्तांच्या नुकसानीचे पंचनामे शासनाला सादर केल्यास आपण व्यवस्थित पाठपुरावा करू, अशी ग्वाही वेळोवेळी आ.भरत गोगावले यांनी दिली.



# भेकर जातीच्या वन्यजीवाला रानसई वनपरिक्षेत्राच्या नैसर्गिक अधिवासात करण्यात आले मुक्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

निसर्गानं आपल्याला भरभरून दिलं आहे त्याच्या कुशीत सामावलेल्या सर्व साधन–संपत्तीचं जतणं करणं आणि संरक्षण हे प्रत्येक मानवाचं आद्य कर्तव्य आहे, आणि हे कर्तव्य बाजावणारी निसर्गप्रेमी, वन्यजीवप्रेमी मंडळी हे आपलं कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत असतात त्याचाच उत्तम उदाहरण आज पाहायला मिळालं. कुंडेवहाळ परिसरात दगडखान परिसरातील कामगारांच्या मुलांना भेदरलेल्या अवस्थेत मिळालेला भेकर जातीचा प्राणी दिसून आला. केअर ऑफ़ नेचर सामाजिक संस्थेचे सल्लागार अमोल आंबोलकर या सर्प मित्राला याची माहिती समजताच त्यांनी लागलीच वन्यजीवप्रेमी राजू मुंबईकर यांच्या निदर्शनास आणून दिलं.

रात्री अकरा वाजताच्या सुमारास त्या ठिकाणी जाऊन त्या भेदरलेल्या अवस्थेतील भेकराला त्या मुलांकडून या वन्यजीवप्रेमींनी आपल्या स्वाधीन घेत प्रथमतः याची माहिती वनविभागातील अधिकाऱ्यांना कळविली आणि त्या वन्यजीवला पुढे निसर्गाच्या सानिध्यात जाऊन राजू मुंबईकर यानी उरण वनपरिक्षेत्र वनविभागातील वनअधिकारी हरिदास करांडे, राजेंद्र पवार, एस.बी.इंगोले या सर्व अधिकारी वर्गाच्या उपस्थितीत रानसई वनपरिक्षेत्राच्या जंगलात मुक्या वन्यजीवाला आपल्या नैसर्गिक अधिवासात मुक्त संचार करण्याकरीता सोडण्यात आले.

# अभिष्टचिंतन...



**दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर, सह संपादक प्रदीप वालेकर, अरविंद पोतदार, अनिल कुरघोडे, ॲड.संजय पाटकर, सुधीर पाटील, गणेश कोळी, केवल महाडिक, सदानंद वेदपाठक आदी मान्यवर.**

